## निशाणी क्र. १ वरील आदेश
## (पारीत दि. ०७.१२.२०२२)

१. प्रस्तुत अर्ज जन्म मृत्यु नोंदणी कायदा, १९६९ चे कलम १३(३) नुसार अर्जदार यांनी त्यांची आई कै. गंगीबाई राघो चौधरी यांच्या मृत्युची नोंद होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे कै. गंगीबाई राघो चौधरी यांचा मृत्यु दि. १५/०३/२००१ रोजी मौजे ताडवाडी वावर्ले ता. खालापुर जि. रायगड येथे झाला. परंतु त्यांचे मृत्युची नोंद अनावधानाने करण्याचे राहून गेले. त्यांचे मृत्युची नोंद ग्रुप ग्रामपंचायत बोरगाव खुर्द यांचे दप्तरी नसल्याबाबत अर्जदार यांनी संबंधित ग्रामपंचायतीचा दाखला दाखल केलेला आहे. मयत कै. गंगीबाई राघो चौधरी यांच्या मृत्युची नोंद करण्याचे आदेश देण्याबाबतची विनंती अर्जदाराने केलेली आहे.

३. सामनेवालाकडून प्रस्तुत अर्जासंबंधी खुलासा मागविण्यात आला. सामनेवाला यांना नोटीस बजावणी होउन सामनेवालाने त्यांचे म्हणणे निशाणी ०९ कडे दाखल केले आहे. सामनेवालाचे म्हणण्या नुसार मृत्यु नोंदणी अभिलेखाचा शोध घेण्यात आला आणि असे दिसून आले की, ग्रुप ग्रामपंचायत बोरगाव खुर्द येथील मृत्यु नोंदणी रजिस्टरमध्ये कै. गंगीबाई राघो चौधरी यांच्या मृत्युची नोंद उपलब्ध नाही. अर्जदारातर्फे वकिलांनी युक्तीवाद केला.

४. अर्जदार यांच्या आधार कार्डची व्हेरिफाईड प्रत नि.क्र. ०८ कडे, अर्जदार यांचे पुराव्याचे प्रतिज्ञा पत्र निशाणी क्र. १० कडे, अर्जदार यांनी दैनिक सागर दि. २०/१०/२०२२ या वर्तमानपत्राची प्रत नि. क्र. १२ कडे, अर्जदारास आणखी काहीही पुरावा दयायचा नाही अशी पुरशिस निशाणी क्र. १३ कडे दाखल केली आहे.

५. उपलब्ध पुराव्यावरुन कै. गंगीबाई राघो चौधरी यांचा मृत्यु दि. १५/०३/२००१ रोजी झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्या मृत्युची संबंधीत रजिष्टरमध्ये मृत्यु–नोंद घेणे न्यायोचीत होईल. करीता, अर्जदाराचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालील आदेश करीत आहे.

आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला यांना निर्देशीत करण्यात येते की, कै. गंगीबाई राघो चौधरी यांचा मृत्यु दि. १५/०३/२००१ रोजी झाल्याची नोंद अर्जदाराने योग्य ते शुल्क भरल्यानंतर संबंधीत अभिलेखामध्ये करण्यात यावी.

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2022.12.07 17:34:27 -0800

खालापुरः (आर. डी. वाबळे )
दि. ०७.१२.२०२२ न्यायधंडाधिकारी प्रथम वर्ग, खालापुर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a)Name of the Stenographer | : | M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b)Court | : | Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C.,<br>Khalapur |
| (c) Date of Judgment/Order | : | 07/12/2022 |
| (d) Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 07/12/2022 |
| (e) Judgment/Order uploaded on | : | 08/12/2022 |